भारतीय जैन संघटना
BJS
Bharatiya Jain Sanghatana
Head Office:
Ground Floor, Muttha Towers, Loop Road, Near Don Bosco Church, Yerawada, Pune 411006
Tel.:020 41200600, 41280011, 41280012
Website: www.bjsindia.org E mail: info@bjsindia.org Facebook: www.facebook.com/BJSIndia

# प्रेस नोट

गेल्या तीन वर्षांपासून महाराष्ट्राची जनता दुष्काळाने होरपळत आहे. दर वर्षी शेतक-यांच्या आत्महत्यांचे प्रमाण तीव्र गतीने वाढत चालले आहे ही एक चिंतेची बाब आहे. एखाद्या शेतक-याने आत्महत्या केल्यानंतर त्याच्या परिवाराचे भवितव्य हा एक मोठा यक्ष प्रश्न उभा राहतो. पत्नी व १-२ लहान मुलं घरामध्ये असताना त्यांचा संपूर्ण संसार उघड्यावर येतो. आत्महत्या करण्यापूर्वी त्या घरामध्ये रोज दुष्काळाचा, पैशाचा व अडीअडचणींचा पाढाच वाचला गेलेला असतो. त्यामुळे संपूर्ण परिवार मानसिक दृष्ट्या एक वेगळ्या तणावाखाली असतो. त्याचे दुष्परिणाम मोठ्याप्रमाणावर होत राहतात व आत्महत्या केलेल्या शेतक-यांचे मुलं-मुली या प्रक्रियेचे सर्वात मोठे शिकार बनलेले असतात. भारतीय जैन संघटनेने (बीजेएस) या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रातून आत्महत्या केलेल्या शेतक-यांचे ७०० मुलं -मुली व ठाणे आणि मेळघाट परिसरातील ३०० आदिवासी मुलं अशा एकूण १००० विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पुणे येथे आणण्याचा निर्धार केला आहे. यासाठी बीजेएसचे पदाधिकारी महाराष्ट्रभर आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या परिवारांच्या गाठी-भेटी घेत आहेत व त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी पुण्याला पाठविण्याकरिता चळवळ उभी करीत आहेत.

बीजेएसचे संस्थापक श्री. शांतीलालजी मुथ्था हे गेली ३० वर्षांपासून अशाप्रकारचे सामाजिक कार्य करीत आहेत. लातूर भूकंपातून १२०० मुलांना पुणे येथे आणून त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून हा प्रयोग पूर्णपणे यशस्वी केला आहे. १९९७ सालापासून मेळघाट परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांना पुणे येथे शिक्षणासाठी आणून त्यांना शिक्षणाबरोबरच सक्षम नागरिक बनविण्यामध्ये बीजेएसने सफलता मिळवली आहे. आत्तापर्यंत ३००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पुनर्वसन बीजेएसने केले आहे. या विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी पिढीचे चेंज एजंट बनविण्यामध्ये बीजेएसला यश प्राप्त झाले आहे.

आज आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या मुला-मुलीना ही संधी प्राप्त करून देण्यात येत आहे. बीजेएसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. प्रफुल्लजी पारख व राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री. सुदर्शनजी जैन यांच्याकडे महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या मुला-मुलीना शिक्षणासाठी पुण्यात आणण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी अथवा अधिक माहितीसाठी संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री सुदर्शन जैन (मोबाईल क्रमांक 9422156523) किंवा जिल्हा समन्वयक श्री. ---------------------------- (मोबाईल क्रमांक ---------------------------------) यांच्याशी संपर्क साधावा.

***

कृपया प्रसिध्दी करिता
**२४ मे, २०१६**

श्री.
**जिल्हा समन्वयक**
संपर्क क्रमांक :